गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ८१ वा ● गुरुवार ०८ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 81 | Date : 08/08/2024 | blow Thursday Page 4 Price 4

## पंढरीतील पुराचा धोका टळला; पाणी ओसरू लागले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील भीमा नदीच्या पात्रात पाण्याची आवक हजारावर आली आहे. बुधवारी दुपारी तीन वाजता भीमा नदीत ८९ हजार क्युसेक पाणी वाहत आहे. विशेष म्हणजे धोक्याच्या पातळीपेक्षा पाण्याची पातळी कमी झाली आहे. उजनी धरणातून दुपारी तीन वाजता ४० हजार क्युसेक पाणी भीमा नदीत सोडण्यात आले. तर वीर धरणातून ५८०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. भीमा नदीत येणारी आवक घटत चालली असून पाण्याची पातळी कमी होत आहे. अद्याप वाळवंटातील सर्व मंदिरे व घाट पाण्याखाली आहेत. पूरग्रस्त भागातील पाणी ओसरल्यानंतर त्या ठिकाणची स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने कामे त्वरित सुरू केल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली आहे.गेली दोन दिवस पुण्यातील पावसाचा जोर कमी झाला. त्यामुळे पुण्यातून येणारी पाण्याची आवक कमी झाली. परिणामी येथील भीमा नदीच्या पात्रातील पाणी कमी झाले. मात्र दुसरीकडे उजनी धरण १०७ टक्के भरले आहे. त्यामुळे उजनीतून भीमा नदीत पाणी सोडले जात आहे. या आधी उजनीतून लाखो क्युसेक पाणी सोडले जात होते. ते आता बुधवारी दुपारी ३ वाजता ४० हजार क्युसेकने सोडण्यात । पान २ वर

# ‘लॉजिस्टिक धोरणा’द्वारे पाच लाख नोकऱ्या

## राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

मुंबई: येत्या पाच वर्षांत राज्यात सुमारे पाच लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणाऱ्या आणि राज्य सरकारला ३० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणाऱ्या महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरणाला बुधवारी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या धोरणांतर्गत नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय रसद केंद्र (इंटरनॅशनल लॉजिस्टिक पार्क) उभारण्यात येणार असून राज्यभरात दहा हजार एकर जमिनीवर रसद केंद्रे सुरू करण्यात येतील.मनुष्यबळ, वाहतूक सेवा, साठवणव्यवस्था, वितरण यंत्रणा पुरवणाऱ्या ‘लॉजिस्टिक’ क्षेत्रातील छोट्या व लघू उद्योगांना पूर्वपरवानगीतून पूर्णपणे सूट देणारे हे धोरण असेल. तसेच राज्य शासन मैत्री कक्षाद्वारे छोट्या उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून देणार आहे. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारसीनुसार उद्योग विभागाने पुढील १० वर्षांतील राज्याच्या विकासाला समोर ठेऊन हे धोरण तयार केले आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, जवाहरलाल नेहरू पोर्ट । पान २ वर

> हे पुस्तक माझ्या कारकीर्दीचा ‘क्लायमेक्स’ नाही आणि मध्यंतरही नाही. हा तर केवळ ‘ट्रेलर’ असून चित्रपट अजून बाकी आहे. आमचे काम बघून अजित पवार हेसुद्धा आमच्या बरोबर सत्तेत सामील झाले. – **एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

> शिंदे विरोधी पक्षात होते, तर मी मुख्यमंत्री होतो. पण, आमचे तेव्हाही मैत्रीचे संबंध होते. ते आजही तसेच टिकून आहेत. अजित पवार आमच्यापेक्षा ज्येष्ठ आमदार असले तरी त्यांचा आणि माझा विक्रम कोणीच मोडू शकणार नाही. **– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

## विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजारांचा दंड होणार

मुंबई : राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपलेली आहे. या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर



राज्याच्या राजकारणात सध्या हालचाली वाढल्या आहेत. विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांचे दौरे सुरु आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमधील पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने विविध मतदारसंघाचा आढावा आणि उमेदवारांची चाचपणी सुरु असल्याचंही सांगितलं जातं. त्यातच राज्यात सध्या सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे.

या पार्श्र्वभूमीवरच आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांनी । पान २ वर

## ओबीसींच्या महाअधिवेशनात फडणवीस यांचे कौतुक; वक्त्यांकडून विविध योजनांचा उल्लेख

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



अमृतसर : राष्ट्रीय ओबीसी महासंघ व इतर संघटनांच्या आंदोलनानंतर ओबीसींच्या हक्कासाठी सरकारकडून अनेक पावले उचलण्यात आली. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी मंत्रालय स्थापन केले, अशा शब्दात अमृतसरमधील ओबीसींच्या महाअधिवेशनात प्रमुख वक्त्यांनी फडणवीस यांचे कौतुक केले.राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे नववे राष्ट्रीय अधिवेशन बुधवारी पंजाबमधील अमृतसरच्या गुरुनानकदेव विद्यापीठाच्या गोल्डन ज्युबिली कन्व्हेन्शन सेंटरमध्ये पार पडले. अधिवेशनादरम्यान विविध वक्त्यांनी फडणवीस यांनी ओबीसींसाठी राबवलेल्या विविध योजनांचा आवर्जून उल्लेख केला. भाजपचे आमदार परिणय फुके म्हणाले, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला संविधानिक । पान २ वर

## लाडकी बहीण योजनेचे दोन्ही हप्ते १७ ऑगस्टला जमा होणार, ३ हजार रुपये खात्यात येणार!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ कोटींपेक्षा जास्त अर्ज शासन दरबारी प्राप्त झाले असून या अर्जाचा ओघ अद्यापही कायम आहे. कारण, राज्य सरकारने १५ ऑगस्टची मुदत वाढवून आता ३१ ऑगस्टपर्यंत लाडक्या बहिणींना अर्ज करण्यासाठी मुभा दिली आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेसाठी महिलांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज केले जात आहेत. त्यातच, आता, लाडक्या बहिणींसाठी आणखी एक गुडन्यूज आली आहे. त्यानुसार, १७ ऑगस्ट रोजीच या योजनेचा पहिला हफ्ता ३००० रुपये महिलांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे, रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार असून याबाबत शासन दरबारी निर्णय झाला आहे. विशेष म्हणजे १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून । पान २ वर

## जन्मेजयराजे भोसले यांनी उजनीच्या पाण्यासाठी लावला दादांना फोन !

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अक्कलकोट शहराच्या व तालुक्याच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील असणारे जन्मेजयराजे भोसले यांनी उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडण्याची मागणी केली. याबाबत त्यांनी अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मोबाईल फोन द्वारे संपर्क साधून उजनीतील पाणी कुरनूर धरणात सोडण्यात यावी ही मागणी केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी याबाबत कार्यवाही करण्याचे आश्र्वासन जन्मेजयराजे भोसले यांना दिले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांची पत्रकारांनी सोमवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी सदिच्छा भेट घेतली.





जन्मेजयराजे भोसले यांनी यावेळी अक्कलकोट शहर व परिसरातील विकास कामांबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीचा अल्पावधीत झालेला विकास हा सर्वांनाच दिलासादायक असल्याचे सांगितले. यावेळी जन्मेजयराजे भोसले यांनी उजनी धरण हे शंभर टक्के भरले असून, या धरणातून लाखो लिटर पाणी हे भीमा नदीत सोडण्यात येत आहे.

उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडल्यास याचा फायदा हा अक्कलकोट शहर व तालुका वासियांना होणार आहे असे सांगितले. जन्मेजयराजे भोसले यांनी तात्काळ आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मोबाईल वरून फोन लावला. उजनी धरणातील पाणी हे कुरनूर धरणात सोडण्यासाठी पाठपुरावा करावा अशी मागणी केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी याबाबत पाठपुरावा सुरू असून लवकरच याची कार्यवाही होणार असल्याची माहिती जन्मेजयराजे भोसले यांना दिले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून धार्मिक सामाजिक सेवा करणारे लाखो भाविकांना महाप्रसादाची मोफत सोय करणारे जन्मेजयराजे भोसले हे अक्कलकोट शहर व तालुक्यातील जनतेसाठी तेवढेच कार्यतत्पर असल्याचे त्यांच्या कृतीतून दिसून आले. जनतेच्या समस्यासाठी सदैव दक्ष असल्याचे जन्मेजयराजे भोसले यांच्यातून दिसून आले.

## अन्न व औषध विभागाकडून मोठी कारवाई दोन वाहनासह २६ लाख १२ हजार अन्न पदार्थाचा साठा जप्त

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः ५ ऑगस्ट २०२४ रोजी दक्षता विभागाचे सह आयुक्त डॉ.राहूल खाडे यांच्याकडून प्राप्त गोपनिय माहितीच्या अनुषंगाने पुणे विभागातील विशेष भरारी पथकाचे सहायक आयुक्त देसाई यांना तात्काळ बार्शी येथे जाण्यास सांगितले. त्यावरून देसाई हे सर्व अन्न सुरक्षा अधिकारी रेणुका पाटील, नंदीनी हिरेमठ व उमेश भुसे यांच्यासह बार्शी तालुक्यातील मु.पो. कोरफले, ता बार्शी, जिल्हा सोलापूर या ठिकाणी हजर झाले. सदर ठिकाणी नेताजी तानाजी बरडे यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-१२ एलटी-९८५३ व महिंद्रा पिकअप वाहन क्र.-१३ एएन-३९५५ हे दोन्ही वाहने संशयरित्या थांबल्याचे सदर पथकास आढळून आले. त्यानंतर सदर पथकाने दोन्ही वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये बादशहा गुटखा या प्रतिबंधित अन्न पदार्थाचे एकूण ३५ पोती, किंमत रूपये १६ लाख १२ हजार ८०० रूपये तसेच महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-१२, एलटी ९८५३ किंमत रूपये ५ लाख व महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-१३ एएन-३९५५ किंमत रूपये ५ लाख असे एकूण एकत्रित किंमत रूपये २६ लाख १२ हजार ८०० चा मुद्देमाल आढळून आला. त्यानंतर सदर प्रकरणी रेणुका पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी पुढली कारवाई घेऊन बार्शी तालुका पोलिस स्टेशन, बार्शी येथे रात्री उरिशपर्यत फिर्याद दाखल करण्याचे कामकाज चालु होते. तसेच उपरोक्त प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करूण ताब्यात घेण्यात आलेले आहे.सदरची कारवाई दक्षता विभागाचे सह आयुक्त डॉ.राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष भरारी पथकाचे सहायक आयुक्त देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी रेणुका पाटील, श्रीमती नंदिनी हिरेमठ व भुसे यांच्या पथकाने पुर्ण केली. असे अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त देसाई यांनी सांगीतले.

# जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ६ लाख १५ हजार अर्ज प्राप्त : जिल्हाधिकारी

### * तालुकास्तरीय तपासणी समितीकडून ५ लाख ४८ हजार अर्ज जिल्हास्तरीय समितीकडे वर्ग * प्रशासनाकडे प्राप्त झालेले ४ लाख ऑफलाईन अर्ज अत्यंत गतिमान पद्धतीने ऑनलाईन करण्यात आले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासनाची अत्यंत महत्वकांक्षी योजना म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्यात सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही जिल्ह्यात या योजनेची प्रचार प्रसिद्धी सुरू असून दिनांक ७ ऑगस्ट २०२४ सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६ लाख १४ हजार ९७० अर्ज या योजनेत तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत जिल्ह्यातील एक ही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा दक्ष राहून काम करत आहे. ग्राम स्तरावर अशा सेविका ग्रामसेवक त्यांच्याकडे अर्ज प्राप्त होत आहेत तर महा-ई-सेवा केंद्रा द्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज अपलोड केले जात आहेत. जिल्हा महिला व बाल विकास विभाग



जिल्हा परिषद जिल्हा परिषदेचा महिला बाल विकास विभाग आदी विभागाच्या वतीने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून ही योजना सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यात प्रशासनाला यश प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम स्तरावर अंगणवाडी सेविका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेत आहेत. तसेच प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना या योजनेविषयी सविस्तर माहिती देऊन कोणत्या कागदपत्राची पूर्तता करणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन अंगणवाडी सेविकेकडून केले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात या योजनेचे अर्ज भरण्यासाठी पात्र महिला मोठ्या संख्येने येत आहेत.


या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरापर्यंत अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेले असल्याने जवळपास चार लाख अर्ज ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे प्राप्त झालेले होते. तर नारीशक्ती दूत पवर दोन लाख पंधरा हजार अर्ज ऑनलाईन प्राप्त झालेले आहेत. ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे आलेले सर्व अर्ज अत्यंत गतीने ऑनलाईन करण्यात आलेले आहेत. प्राप्त सर्व अर्जांची तपासणी तालुकास्तरीय तपासणी समितीने केलेली असून यातील ५ लाख ४८ हजार ६५९ अर्ज समितीने जिल्हास्तरीय समितीकडे पाठवलेले आहेत तर ५९ हजार ३८९ अर्ज कागदपत्रांच्या त्रुटीमुळे रद्द करण्यात आलेले असून कोणत्या कागदपत्राची कमतरता आहे याविषयीचा मेसेज संबंधित लाभार्थ्याच्या मोबाईलवर तालुकास्तरीय समितीने पाठवलेले आहेत. रद्द केलेल्या अर्जावर संबंधित लाभार्थ्यांनी त्रुटीबाबतचे कागदपत्र अपलोड केल्यास त्यांचे अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे वर्ग करण्यात येणार आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी आर. बी. काटकर व जिल्हा । पान २ वर

# संपादकीय

## पालक कमी पडतात ..?

मुलांमधील पार संपत चाललेला संवाद किंवा अडनिड्या वयातील विसंवाद हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. तथापि ज्या कुटुंबात असा संवाद असतो त्या कुटुंबातील मुले त्यांच्याही नकळत सुजाण बनतात. याचा अनुभव नुकताच लखनौ पोलिसांना आणि पालकांना आला. त्या घटनेचे वृत्त माध्यमात प्रसिध्द झाले आहे. ते असे, एक मुलगी पाचवीत शिकते. तिचे वडील राजकीय नेते आहेत. शाळा सुटल्यावर तिच्या अपहरणाचा प्रयत्न दुचाकीस्वारांनी केला. 'तुझ्या बाबांनी तुला तातडीने बोलावले आहे. आम्हाला तुला घ्यायला पाठवले आहे', असे त्यांनी तिला सांगितले. तथापि 'अनोळखी यक्तींबरोबर जायचे नाही आणि कोणी काही दिले तर खायचे नाही असे माझ्या आईने मला सांगितले आहे.' असे त्या मुलीने त्या व्यक्तींना सांगितले. ते मुलीला जबरदस्ती करत होते, ते गर्दीचे ठिकाण असल्याने त्यांनी तिथून पळ काढला, मुलगी घरी गेल्यावर वडिलांनी तिला बोलावले नसल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हेच कारण सांगून मुलांचे अपहरण केल्याच्या घटना अधूनमधून घडतात. उपरोक्त घटनेतील मुलीला तिच्या आईने काही गोष्टी शिकवल्या नसत्या तर चित्र कदाचित वेगळे असू शकले असते. मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार करणे हे पालकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी संवाद आत्यंतिक गरजेचा असतो. तो साधण्यासाठी वेळ काढावा लागतो, ज्याची उणीव असल्याचा बहाणा सतत पुढे केला जाताना आढळतो. तथापि संवादाची गरज आणि वेळ वाया कुठे जातो याचे अवलोकन किती पालक करत असतील? संस्कार करण्यात गोष्टी आणि बोधकथा मोलाची भूमिका बजावतात. मोठ्यांचा आदर करणे, सकारात्मक विचार करणे, नम्रता, प्रामाणिकपणा, प्रेम, आपुलकी, साहचर्य, सहनशक्ती किंवा कर्तव्यभावना अशा अनेक गोष्टी सहज मारलेल्या गप्पांमधूनही शिकवल्या जाऊशकतात. त्या मुलीच्या आईने तिला सावधान कसे राहायचे, प्रसंगांचा सामना कसा करायचा हे शिकवले असावे म्हणूनच ती मुलगी धाडसाने तिचे अपहरण टाळू शकली. विसंवादाचे विपरीत परिणाम समाजाच्या अनुभवास येतात. बालगुन्हेगारी वाढत आहे. किरकोळ कारणांसाठी पंधरा-सोळा वर्षांची मुले एकमेकांच्या जीवावर उठतात. शाळेतील त्याच वयाची मुले त्यांच्याच मित्रांवर रॅगिंग करतात. अनेक मुले व्यसनांच्या आहारी जातात. तेव्हा मुलांना संस्कार किंवा वळण नाही, असे सरसकट बोलले जाते. पण ते लावण्यात त्यांचे पालक कमी पडले असू शकतील का?

## सुसंस्कृत महाराष्ट्राच्या राजकारणाची पातळी घसरली



सध्याची महाराष्ट्रातील राजकारण कमालीचं गढूळ आणि दूषित झालं आहे. मतदारांच्या जीवावर निवडून आलेले लोकप्रतिनिधी अर्वाच्य आणि खालच्या पातळीवरील भाषेचा वापर करताना पाहयला मिळत आहेत. परिणामी राजकीय नेत्यांवरील विश्र्वासार्हता हळूहळू लोप पावत असून राजकारणाचा चिखल झालाय अशी भावना जनता व्यक्त करत आहे.

राजकारणाचा पोत आता बिघडत चालला का अशी चित्र दिसत आहे .वैचारिक टीका करण्यापेक्षा अत्यंत खालच्या पातळीवर टीका करण्याची जणू स्पर्धा गेल्या काही महिन्यापासून लागली आहे. महाराष्ट्र सारख्या सुसंस्कृत राज्यात राजकीय मंडळींनी जे संकेत नियम,प्रथा पाळल्या होत्या त्यांनाच आता कुठेतरी हरताळ फासला जात असून यांवर महाराष्ट्राची राजकीय पातळी कुठे घसरली आहे स्पष्ट दिसते. नेत्यांनी आरोप-प्रत्यारोप आणि टीका करताना मोठ्या प्रमाणात शिव्यांचा वापर केला आहे. जे शब्द नेत्यांच्या तोंडात शोभत नाहीत, असे शब्द महाराष्ट्रानं ऐकले. पुरोगामी आणि सुसंस्कृत महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात असे शब्द कधी ऐकायला मिळाले नाहीत. परंतू सध्या अत्यंत खालच्या भाषेचा वापर होत आहे. एकिकडं महाराष्ट्राच्या राजकारणात नेत्यांकडून गलिच्छ भाषा ऐकायला मिळत असताना, दुसरीकडं राजकीय नेत्यांविषयी लोकांमध्ये प्रचंड चीड आणि संतापाची भावना आहे. आम्ही लोकप्रतिनिधींना विभागातील विकास करण्यासाठी निवडून देतो, ऐकमेकांना शिव्या देण्यासाठी किंवा तुमचा वैयक्तिक राग काढण्यासाठी नाही, असा नाराजीचा सूर सामान्य लोकांमध्ये आहे. ग्रामीण भागात काही ठिकाणी जनता मतदानावर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत आहे. तसेच वाईट भाषेमुळं नेत्यांवरील विश्र्वासार्हता हळूहळू कमी होत आहे, असंही चित्र पाहयला मिळत आहे.आता बस झाले कुठे तरी थांबले पाहिजे येणाऱ्या नवीन पिढीला काय आदर्श देणार आहोत याचं भान राजकीय मंडळींनी ठेवले पाहिजे हिचं माफक अपेक्षा आहे..

**धोंडपा नंदे, वागदरी**

# लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १४ आगष्ट १९३१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा. तसेच ५ आगष्ट १९४६ ला म्हटले होते की, हक्क मिळविण्यासाठी आपला लढा चालूच राहील. या दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-IN- : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५९ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ४ आगष्ट २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या कार्यालयात आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना भारतीय जन संघर्ष सेनेचे अध्यक्ष सुशील भिसे म्हणाले की, प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण होईपर्यंत पुढे जाणे शक्य नाही. करिता कैडर्स बेस कार्यकर्ते तैयार केले पाहिजे. जे कार्य फुले शाहू आंबेडकरांईट स्टडी सर्कल मार्फत सातत्याने सुरु आहे. प्रस्थापित पक्ष बहुजन मुस्लिमांना मतासाठी गृहीत धरतात. आपण आपल्या विचारधारेला रुजवायला कमी पडत असल्याने प्रस्थापित प्रबळ ठरत आहेत. करिता आपण आपल्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविली पाहिजे.याप्रसंगी अनिल खरतडे म्हणाले की, चळवळ यशस्वी करण्यासाठी एकत्रित लढने आवश्यक आहे. धर्मांतरित बौद्ध एकसंघ नसल्याने ते शक्य होत नाही. न्यायमूर्ती बी. आर. गवई सारखी माणसे कु-हाडिचा दांडा गोतास काळ ठरत आहेत. राजू मगरे म्हणाले की, चुकीच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवल्याने ते जनतेला दिशाहीन करून विश्र्वासघात करतात. तडजोड करून का होईना सत्तेपर्यंत पोहोचले पाहिजे. सुभाष वानखेडे म्हणाले की, आरक्षण वाद्यांचे नुकसान केवळ भाजपच करतो असे नाही तर काँग्रेस सुद्धा जास्त दोषी आहे. ओबीसींना ओबीसींचा अर्थच कळत नसल्याने ते चळवळीपासून कोसो दूर आहेत. महादेव डांबरे म्हणाले की, आपण जरी बहुसंख्येने असलो तरी पुढे घेऊन जाणारे सक्षम नेतृत्व, कमांडर नसल्याने अल्पसंख्याक आपल्या छाताडावर बसून राज्य करीत आहेत. सुनिल बोराडे म्हणाले की, समाजातील उच्च पदस्थ अधिकारी सामान्य जनतेच्या वस्तीत जात नाहीत.

प्रमुख वक्ते एड. विलास रामटेके म्हणाले की, काँग्रेस व भाजपा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यातील एक छुपा तर दुसरा दृश्य शत्रू आहे. म्हणून दगडापेक्षा वीट मऊ असे म्हणून स्वीकारणे हानिकारक ठरेल.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी स्टडी सर्कलच्या बातम्यां प्रकाशित केल्या आहेत. मूलनिवासी बहुजन समाजातील राजकीय पक्ष अस्तित्वहीन होणे हे सामाजिक चळवळीच्या अध:पतनाचे परिणाम आहेत. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते की, चळवळीतील पुढा-यांवर करडी नजर ठेवली पाहिजे. तसेच जो दुसऱ्यावरी विश्र्वासला त्याचा कार्य भाग बुडाला. एवढे स्पष्ट केलेले असताना सुद्धा आपली माणसं शत्रूच्या टाचेखाली गुलामाप्रमाणे का काम करतात? बहुजन समाजातील नेतृत्वाचे दखलपात्र कार्य होत नसल्याने इतर त्यांची दखल घेत नसतात. आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय असलेल्यांना दिले असल्याने आर्थिक आधार घेऊन क्रिमी लेअरची अट लागू करणे असंवैधानिक आहे. भाजपचे सुब्रमण्यम स्वामी आरक्षण निष्प्रभ करणे ही त्यांची प्राथमिकता आहे, असे म्हटले होते. त्याची पूर्तता करण्यासाठी ते संवैधानिक संस्थाचा गैरवापर करून अंमलबजावणी करीत आहेत. एका काळात बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? असा प्रश्र्न ग्रंथ रुपात विचारला होता. वर्तमानात आपण काँग्रेस, बीजेपी सारख्या शासनकर्त्यांनी सर्व संवैधानिक समूहाच्या उत्थानासाठी काय केले आहे?अशा प्रश्र्नाचे विश्र्लेषण संदर्भासहीत जनतेसमोर मांडले पाहिजे. करिता प्रासंगिकता लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आगष्ट १९३१ ला कोटा येथे म्हटल्याप्रमाणे लढा बिकट वाटत असला तरी पार पाडण्याची जबाबदारी आपलेपणाच्या नात्याने स्विकारा तसेच ५ आगष्ट १९४६ ला पुणे येथील सभेत म्हटल्याप्माणे हक्क मिळविण्यासाठी आपला लढा चालूच ठेवला पाहिजे म्हणून त्या विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त हा विषय चर्चेला घेण्यात आला आहे. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने यांनी केले. या कार्यशाळेला सुनिल बोराडे, सुशील भिसे, महादेव डांबरे, सुभाष वानखेडे, अरुण इंगळे, राजू मगरे, अनिल खरतडे, साधू आनंद, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे एड. विलास रामटेके यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

## जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी..

परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली आहे.

तालुकास्तरीय समितीकडून प्राप्त झालेले ५ लाख ४८ हजार अर्ज यावर जिल्हास्तरीय समिती कडून छाननी करण्यात येऊन विधानसभा क्षेत्रनिहाय गठित होणाऱ्या समितीची अंतिम मंजुरी घेऊन पुणे येथील आयुक्त महिला व बालविकास यांच्याकडे पाठवण्यात येणार आहेत. आयुक्त महिला व बालकल्याण पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या मंजूर अर्जावर महिला व बालकल्याण आयुक्त कार्यालयाकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याची कार्यवाही होणार आहे.जिल्ह्यात तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर तालुकास्तरीय समितीकडून छाननी करण्यात येऊन जिल्हास्तरीय समितीकडे पाठवण्याची टक्केवारी ८९.२२% इतकी आहे.

## पंढरीतील पुराचा धोका ..

आले आहे. तर दुसरीकडे वीर धरणातून पुन्हा पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. वीर धरणातून ५८०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. भीमा नदीत दुपारी ३ वाजता ८९ हजार क्युसेकने पाणी वाहत आहे. पाणी उतरण्याचा वेग कमी आहे.

शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीत शिरलेले पाणी ओसरू लागले आहे. पालिकेने तातडीने त्या ठिकाणी साठलेला गाळ, कचरा उचलण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच 'डीडीटी पावडर', फवारणी सुरू केल्याची माहिती पालिकेचे उप मुख्याधिकारी ड. सुनील वाळूजकर यांनी दिली आहे. सद्यपरिस्थितीत भीमा नदीची धोक्याच्या पातळीपेक्षा कमी पाण्याची पातळी झाली आहे. त्यामुळे पुराचा धोका टळला असला तरी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## ओबीसींच्या महाअधिवेशनात ..

अधिकार मिळावे म्हणून फडणवीस यांनी पंतप्रधानांकडे पाठपुरावा केला. राज्य सरकारने २८ आदेश काढले. त्यामुळे ओबीसींचे बरेच प्रश्र्न सुटले, असा दावा फुके यांनी केला. काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि खासदार नामदेव किरसान यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी संसदेत लावून धरण्याचे आश्र्वासन दिले.

अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संदेश चित्रफितीद्वारे दाखवण्यात आला. यात ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसींसाठी विविध योजना राबवत आहेत. त्यांनी मागासवर्ग आयोगाला संविधानिक दर्जा दिला. केंद्रीय वैद्याकीय कोटा २७ टक्के केला. राज्य सरकारनेही ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आधार योजना सुरू केली. राज्यात ५२ इमारती वसतिगृहासाठी भाड्याने घेतल्या.

विविध राज्यात इतर मागासवर्ग प्रवर्गात विविध धर्मातील जातींचा समावेश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ओबीसी समाज काही धर्मशाळा नव्हे. विविध जातींचा समावेश आम्ही होऊ देणार नाही, असे वक्तव्य राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी केले.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी या महाधिवेशनात ३० ठराव मांडले. ते सर्व संमतीने मंजूर झाले. यात ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना, ओबीसी क्रिमिलेअरची मर्यादा वाढ, आरक्षणासाठी ५० टक्क्यांची अट रद्द करण्याच्या ठरावांचा समावेश होता.

## 'लॉजिस्टिक धोरणा'द्वारे पाच

प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट, राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचा या धोरणात सहभाग असणार आहे.त्यानुसार राज्यात सन २०२९ पर्यंत १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित रसदविषयक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील. त्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच या धोरणाच्या माध्यमातून राज्याला सुमारे ३० हजार ५७३ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे.

पनवेल येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात दोन हजार एकरवर आंतरराष्ट्रीय महा रसद केंद्र विकसित करण्यात येणार आहे. या क्षेत्रात तळोजा, पाताळगंगा, रसायने, खोपोली, महाड, रोहा, चाकण, तळेगांव या औद्योगिक वसाहती संलग्न असल्यामुळे पनवेल आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र होईल. या हबच्या विकासासाठी१५०० कोटींची तरतूद करण्यात येणार आहे.

## लाडकी बहीण योजनेचे दोन्ही

उपस्थित राहतील. १७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करुन ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १ कोटी अर्जांची छाननी ही पूर्ण झालेली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली असून आता त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. या योजनेचा पहिला हप्ता रक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट १७ ऑगस्ट रोजी जमा होणार आहेत.

## विना परवानगी झाड तोडल्यास ..

राज्यातील विविध प्रश्र्नासंदर्भात आढावा घेत सविस्तर चर्चा केली. याच बैठकीत १३ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आता दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच यापुढे आता विना परवानगी झाड तोडल्यास ५० हजार रुपयांचा दंड होणार आहे. दरम्यान, आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आदी मंत्री उपस्थित होते.

**राज्य सरकारने कोणते निर्णय घेतले?**

* शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये आता मोठ्या प्रमाणावर सिंचन सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय. महत्वाकांक्षी वैनगंगा- नळगंगा नदीजोड प्रकल्पास राज्य सरकारची मान्यता. तेसच पावणे चार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार. * आता प्रकल्पबाधितांना सदनिका मिळणार, यासंदर्भातील धोरणास सरकारची मान्यता.* लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग येणार, कर्ज उभारण्यास सरकारची मान्यता.* आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय.* अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबतच्या अडचणी दूर होणार. अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय.* विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार रुपये दंड होणार.* महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार, पाच वर्षात तीस हजार कोटींचे उत्पन्न मिळणार.* कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय, आजरा तालुक्यात योग व निसर्गोपचार महाविद्यालय.* न्यायमूर्ती, मुख्य न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घर कामगार, वाहनचालक सेवा मिळणार.* सेना कल्याण शैक्षणिक संस्था आणि राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला मुद्रांक शुल्कात १०० टक्के सूट.* जुन्नरच्या श्री कुकडेश्र्वर आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेस अर्थसहाय्य.* ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविणार, अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविणार, विविध कार्यक्रमांचे आयोजन.

## उजनीच्या ओव्हरफ्लो पाण्याने बंधारे, तलाव, मध्यम प्रकल्प भरुन घ्यावे : बाळराजे पाटील

मोहोळ/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी चांगला पाऊस झाला आहे. मात्र गतवर्षी अत्यल्प प्रमाणात पाऊस पडल्यामुळे भूजल पातळी म्हणावी तशी वाढली नाही. उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. सध्या उजनीतून ओव्हरफ्लो झालेले पाणी सोडणे सुरू आहे. हे पाणी कालव्याद्वारे निरंतर सुरू ठेवून मोहोळ तालुक्यासह उजनीच्या लाभक्षेत्र परिसरातील सर्व बंधारे तलाव, मध्यम प्रकल्प भरून घेण्यात यावेत, अशी मागणी लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली. याबाबत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार त्याचबरोबर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडेही पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. बाळराजे पाटील पुढे बोलताना म्हणाले, जलसंपदा विभागाने शिस्तबद्ध नियोजन करून मोहोळ तालुक्यातील मोहोळ, आष्टी, कामती, लांबोटी, अर्जुनसोंड, आष्टी उपसा सिंचन योजनेतून व शिरापूर उपसा सिंचन योजनेत पाणी सोडून तालुक्यातील अनेक ओढ्यावरील बंधारे भरुन घेण्याबाबत उपाययोजना करावी. सध्या उजनी धरणातून सीना भीमा जोड कालवा, उजनी डावा कालवा, उजनी उजवा कालवा, भीमा नदीतून पाणीसाठा सोडले जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कामगार महासंघाच्या वतीने कार्यकारी अभियंता कोथले यांचा सत्कार



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

तुळजापूर/प्रतिनिधी: येथील महावितरण विभागीय कार्यालय येथे नव्याने रुजू झालेले अतिरिक्त कार्यकारी अभियंता दिपक कोथले यांचा महाराष्ट्र विज कामगार महासंघाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तुळजापूर महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश गुजर हे सेवानिवृत्ती झाल्यामुळे त्यांच्या ठिकाणी नुकतेच रुजू झालेले अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणून दिपक कोथले यांचा महावितरण विभागीय कार्यालय येथे विज कामगार महासंघाच्या वतीने शाल, श्रीफळ, फेटा, बांधून सत्कार करण्यात आला. यावेळी लातूर परिमंडळ उपाध्यक्ष सुनील बडे, परिमंडळ सचिव प्रवीण रत्नपारखी, धाराशिव मंडळ अध्यक्ष आनंद लिमकर, उपाध्यक्ष सातय्या स्वामी, सचिव निलेश भिरंगे, तुळजापूर विभाग सचिव श्यामआबाचणे,जयकर कोळगे, सचिन डोंगरे, विकास गाडेकर,किरण गुरव,अनिस शेख,बालाजी जाधव, मोहन गुरव, महिला प्रतिनिधी शैला लोंढे,बी.बी.गोडसे,कल्पना जेटीथोर यांच्यासह मंडळ,विभागीय पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची अवहेलना;

## तालुका कृषी अधिकारी यांच्यासह जन माहिती अधिकाऱ्यांचा प्रताप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

देऊळगाव राजा : तालुका कृषी कार्यालयातील विविध योजना संदर्भात मागितलेल्या माहितीविषयी राज्य माहिती आयोग अमरावती खंडपीठाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या पार्श्र्वभूमीवर राज्य माहिती आयोगाने आदेश देऊनही तालुका कृषी अधिकारी यांनी सुनावणीस टाळाटाळ केल्याचा प्रकार तालुका कृषी कार्यालयात उघडकीस आला.आयोगाच्या आदेशानंतर ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन प्रकरण निकाली न काढता चक्क महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची अवहेलना करण्याचा प्रताप संबंधित अपीलीय अधिकारी यांनी केल्याचे उघड झाले आहे. दरम्यान माहिती अधिकारात पाहिजे असलेले शासकीय अभिलेख गहाळ झाल्याची संभावना व्यक्त होत आहे.

देऊळगाव राजा तालुका कृषी कार्यालयात मार्फत शासनाने राबविलेल्या शेतकरी विषयक योजना संदर्भात महिती अधीकार कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये २२ डिसेंबर २०२१ रोजी माहिती मागितली होती. सदर माहितीत मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या प्रथम अपील अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केला. याचबरोबर महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती येथे अपीलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केले.यावर माहिती आयोगाने ७ मार्च २०२४ रोजी एका आदेशाद्वारे सदर प्रकरणावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याचे आदेश दिले. माहिती आयोगाच्या आदेशानंतर ३० दिवसाच्या आत अपील अधिकारी यांनी सदर प्रकरण निकाली लावण्याचे अपेक्षित असताना माहिती आयोगाच्या आदेशाला ४ महिने उलटले तरीही अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांनी अद्याप पर्यंत माहिती अधिकार अर्जावर सुनावणी घेतली नाही. परिणामी महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती यांच्या आदेशाची अवहेलना तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून झाली आहे. अपीलार्थी यांच्या माहितीसाठी च्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील त्यावर सुनावणीच्या वेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यात मदत होऊ शकते. असे असताना तालुका कृषी कार्यालयातील अधिकारी व प्रथम अपीली अधिकारी यांनी सुनावणी न घेता जन माहिती अधिकार कायद्याची तसेच राज्य माहिती आयोगाचीआदेशांची अवहेलना केली आहे. दरम्यान तालुका कृषी अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी देऊळगाव राजा यांच्याविरुद्ध माननीय माहिती आयुक्त अमरावती खंडपीठ यांनी पारित केलेल्या आदेशानुसार सुनावणी न घेता तसेच आदेश पारित न करता शासन परिपत्रकाची अवहेलना केल्याप्रकरणी व शासकीय अभिलेख गहाळ केल्याप्रकरणी कायदेशीर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी अपीलार्थी माहिती अधिकार कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली आहे.

# जिल्ह्यातील आजी माजी सैनिकांसाठी महसूल विभागामार्फत १० ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रम

## महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात येणार.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व सेवारत सैनिक व त्यांचे अवलंबित यांना महसूल सप्ताहानिमित्त शनिवार दि.१० ऑगस्ट रोजी सर्व तालुक्यामध्ये आजी माजी सैनिकांसाठी महसूल दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यादिवशी तहसिलदार व महसूल कर्मचारी आजी माजी सैनिकांच्या महसूल संबंधित कामे करण्यासाठी तहसिल कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय सुरक्षिततेल्या कामी सीमावर्ती भागामध्ये व सुरक्षिततेच्या दृष्टिने अन्य संवेदनशील भागांमध्ये तैनात असणारे संरक्षक दलातील अधिकारी, सैनिक यांना व त्यांच्या कुटुंबियांना आवश्यक असणारे, महसूल कार्यालयाकडून निर्गमित होणारे विविध दाखले, प्रमाणपत्रे मिळणेबाबत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किंवा समादेशक अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अर्जावर कार्यवाही करण्यात येईल. संरक्षण दलात कार्यरत असताना शहीद झालेल्या कर्मचाऱ्यांना जमीन वाटप करण्याबाबत प्रलंबित असलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच संरक्षण दलातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांना घरासाठी, शेतीसाठी जमीन वाटपाबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात येतील. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्र्न निकाली काढण्यात येतील असे तुंगार यांनी सांगितले आहे.

प्रत्येक तहसिल कार्यालयात एक नोडल अधिकारी नेमण्यात आला आहे. शासनाच्या सदर उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी उत्तर व दक्षिण सोलापूर तहसीलमधील जास्तीत जास्त आजी माजी सैनिकांनी व त्यांच्या अवलंबितांनी सर्व कागदपत्रासह २ प्रतित अर्जासह दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता उत्तर व दक्षिण सोलापूर तहसिल कार्यालयात उपस्थित रहावे.तसेच इतर तालुक्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांनी व त्यांच्या अवलंबितांनी अडी-अडचणी बाबतची निवेदने सहपत्रासह दोन प्रतित संबंधित तहसिल कार्यालयात दिनांक १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत सादर करावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# नळदुर्ग हे ऐतिहासिक शहर तालुका निर्मितीसाठी राज ठाकरे मुख्यमंत्र्यांना साकडे घालणार

## नळदुर्ग तालुका निर्मिती अहवाल मनसे टीमने राज ठाकरे यांच्या कडे सादर केला

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे हे धाराशिव येथे विधानसभा निवडणुकी संदर्भात चाचपणी करण्यासाठी व पदाधिकारी यांना मार्गदर्शक करण्यासाठी आले होते,याप्रसंगी नळदुर्ग मनसेचे पदाधिकारी यांना आवर्जून भेटीसाठी त्यांनी बोलावलं,मनसेचे शहराध्यक्ष अलिम शेख,शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी यांनी नळदुर्ग तालुका होण्यासाठी पक्षाच्या वतीने वेळोवेळी आवाज उठवला व शासनाकडे १२५ पानी अहवाल दिला असून,वर्षभरापूर्वी शासनाने कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नवीन तालुके निर्मितीसाठी समिती गठीत केली आहे,त्या समितीची भेट घेऊन हि निवेदन व अहवाल दिल्याचे सांगितले,गेल्या ४० वर्षांपासूनची नळदुर्ग तालुक्याची मागणी असून,अप्पर तहसील कार्यालय निर्मितीचा विषय सुद्धा बाजूला पडल्याचे सांगितले,यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्याशी व संबंधिताशी बोलू असे पदाधिका-यांना आश्र्वासित केले आहे,यावेळी जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव,जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे,तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार,विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे,तालुका सरचिटणीस गणेश पाटील,नळदुर्ग शहराध्यक्ष अलिम शेख,शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी,मनविसे तालुकाध्यक्ष सूरज चव्हाण, गणेश बिराजदार,सोमेश्र्वर आलूरे उपस्थित होते.



# ग्रामपंचायत सदस्या सौ.प्रियांका देविदास माने यांचा उपक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दर्शनाळ/प्रतिनिधी:अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा व उर्दू अंगणवाडी येथे वेस्ट झोनचे खजिनदार व सोलापूर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन खजिनदार व पंढरपूर तालुका अध्यक्ष श्री.प्रशांत खलिपे यांच्या वाढदिवसानिमित्त दर्शनाळ ग्रामपंचायत सदस्या सौ. प्रियांका देविदास माने यांच्यावतीने वही, पेन, खाऊ ,साडी , वाटप आयोजन केले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वही, पेन, खाऊ, महिला साडी, वाटपाचे आयोजन दर्शनाळ ग्रामपंचायत सदस्या सौ. प्रियांका माने यांनी केले आहे. स्थळ दर्शनाळ जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा दर्शनाळ श्री. प्रशांतजी खलिपे यांचा वाढदिवस ११ ऑगस्ट रोजी रविवार असल्याने वार सोमवार १२ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक ८ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा येथे कार्यक्रम होणार आहे.

# मुरूम शहराच्या विकासासाठी ३ कोटी रूपयांचा निधी मंजुर

## आमदार ज्ञानराज चौगुले यांची माहिती

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



उमरगा/प्रतिनिधी :उमरगा तालुक्यातील मुरूम शहरातील विविध विकासकामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून ३ कोटी रूपये निधी मंजुर झाल्याची माहिती आ. ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे. विविध विकास कामांना मंजुरी मिळविण्याकरिता ते सातत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करीत होते. यामुळे शहरातील किसान चौक येथे सभामंडप बांधकाम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे २० लाख रूपये, किसान चौकातील काम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे २० लाख, भवानी मंदिराच्या सभामंडप बांधकाम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे २० लाख, माऊली मंदिराच्या सभामंडप बांधकाम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे २० लाख, विरशैव कक्कया समाज वस्ती (नेहरु नगर) सामाजिक सभागृह बांधकाम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे ४० लाख, विरशैव कक्कया समाज वस्ती (शिंदे गल्ली) सामाजिक सभागृह बांधकाम व परिसर विकास अनुषंगीक कामे करणे २० लाख, राजशेखर मुदकण्णा कॉम्पलेक्स ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजेंद्र कृषी केंद्र दुकानपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस आरसीसी बंदिस्त नाली, पेव्हर ब्लॉक व इतर अनुषंगिक कामे करणे १ कोटी ६० लाख रूपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून याबाबत आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे आभार मानले आहेत. शहरातील नागरिकांनी वरील मागणीकरिता अनेक वेळा आमदारांकडे पाठपुरावा केला. त्यांनी विविध विकास कामे मंजूर करुन आणल्याबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांचा जिल्हा दौरा

सोलापूर/प्रतिनिधीः १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त कार्यक्रम दुसरा भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यासाठी मतदार यादी निरिक्षक म्हणून पुणे



विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली असून ते मतदार यादी निरीक्षक म्हणून दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून लोकप्रतिनीधी, राजकीय पक्षांच्या जिल्हा अध्यक्ष यांची नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर याठिकाणी दुपारी ३ वाजता बैठक घेणार आहेत. तरी मतदार यादी संदर्भात नागरीकांना काही सुचना असल्यास आजच dydeosolapur@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात याव्यात, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे. यावेळी विभागीय आयुक्त श्री पुलकुंडवार हे सर्व मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व नोडल अधिकारी स्वीप यांच्या कामाचाही आढावा घेतील.

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग व एमसीए च्या प्रवेशासाठी कॅप राऊंड-१ चे ऑप्शन्स फॉर्म भरण्याची प्रक्रिया दि.०९ ऑगस्ट पासून सुरू

## स्वेरी तर्फे विविध ठिकाणी सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग व एमसीए प्रवेशाची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड)चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.०९ ऑगस्ट २०२४ पासून ते रविवार, दि.११ ऑगस्ट २०२४ पर्यंत म्हणजेच एकूण तीन दिवस चालणार आहे. या कालावधीत स्वेरी अभियांत्रिकीच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.क्रमांक ६२२०) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या या पहिल्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर बुधवार दि. १४ ऑगस्ट, २०२४ रोजी तर एमसीए ची अलॉटमेंट यादी दि. १३ ऑगस्ट, २०२४ प्रसिद्ध होणार आहे. ज्यांनी पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी किंवा एमसीए प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन आणि कन्फर्मेशन केले आहे त्यांना या प्रवेश फेरीचा लाभ घेता येईल.' अशी माहीती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

सन २०२४-२५ मध्ये पदवी अभियांत्रिकीच्या व एमसीए च्या प्रवेशाकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, व निश्र्चिती करणे आदी प्रक्रिया पूर्ण झाल्या, त्यानंतर या प्रक्रियेला मुदतवाढही देण्यात आली होती व त्यानंतर तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली. पुढे प्रवेश अर्जातील चुका व त्रुटींची दुरुस्ती (ग्रीव्हेंन्स) करण्याची प्रशासनाकडून मुभा देण्यात आली होती. या सर्व प्रक्रीयेनंतर पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.०९ ऑगस्ट, २०२४ पासून ते रविवार, दि.११ ऑगस्ट, २०२४ पर्यंत या तीन दिवसात होणार आहे.

शुक्रवार, दि.९ ऑगस्ट, २०२४ ते रविवार, दि.११ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत स्वेरीमार्फत सांगोला, बार्शी, महूद, मंगळवेढा, करकंब, अकलूज, करमाळा, कुर्डूवाडी, अक्कलकोट, सोलापूर, माढा, मोहोळ, धाराशिव, टेंभुर्णी, आटपाडी, नळदुर्ग व जत या महत्वाच्या ठिकाणी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या कॅप राऊंड -१ चे ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर ठिकाणी स्वेरीचे तज्ञ प्राध्यापक व त्यांचे सहकारी उपलब्ध असणार आहेत.

त्यांचे संपर्क क्रमांक विद्यार्थी व पालकांपर्यंत लवकरच पोहचवले जातील तरी पालक व विद्यार्थ्यांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा.' असे आवाहन करण्यात आले आहे.

महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, वसतिगृह सुविधा, इतर सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, संशोधने, मानांकने या महत्वाच्या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगसाठी पहिल्या प्रवेश फेरीचे जागावाटप (अलॉटमेंट) बुधवार, दि.१४ ऑगस्ट रोजी तर एमसीए च्या पहिल्या फेरीचे जागावाटप १३ ऑगस्ट रोजी प्रदर्शित केले जाणार आहे. पहिल्या फेरीच्या जागावाटपानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्र्चिती करावी लागणार आहे.

प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर तर एमसीए च्या प्रवेशासंदर्भात प्रा. मनसब शेख (९०२८९०७३६७) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान....

# दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरासाठी दिव्यांगांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

*** दिनांक १९ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत प्रत्येक तालुक्यात दिव्यांग शिबिराचे आयोजन * एकूण २२ दिव्यांग प्रमाणपत्र वाटप शिबिराच्या माध्यमातून १५ हजार ६६६ लाभार्थ्यांची तपासणी करून प्रमाणपत्र वाटप करण्याचे नियोजन**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत तपासणी व निधन विशेष मोहीम कार्यक्रम दिनांक १९ ऑगस्ट २०२४ ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात दोन दिवस याप्रमाणे २२ शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून या शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्यांना दिव्यांगात्वाची तपासणी करून प्रमाणपत्र देण्याचे नियोजन आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांनी या शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तींची कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान शिबिरांची पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मित्राचे संचालक अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा कुष्ठरोग अधिकारी डॉ. मोहन शेगर, प्राथमिक शिक्षण विभागाचे जिल्हा समन्वयक परमेश्र्वर कमाजी जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर तोडकर अक्कलकोट पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी ए आर दोडमणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अस्थिरोग तज्ञ डॉक्टर एस. ए. टेंगले यांच्यासह आरोग्य विभाग व स्वयंसेवी संस्था चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की या शिबिराच्या माध्यमातून जिल्ह्यातील एकही दिव्यांग लाभार्थी प्रमाणपत्रापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावेत. या शिबिरात सर्व यंत्रणांनी अत्यंत सकारात्मकता ठेवून काम करणे अपेक्षित आहे. सर्व डॉक्टर्सनी ही चाकोरी बाहेर जाऊन काम करावे. या शिबिरासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य व सर्व सोयी सुविधांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




त्या अनुषंगाने शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग लाभार्थ्यांची ने - आण करणे व त्या ठिकाणी त्यांना अन्य सुविधा पुरवण्यासाठी कोणत्याही प्रकारची कुचराई होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले. जिल्ह्याच्या अकरा तालुक्यात प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण २२ शिबिराचे आयोजन करण्यात येत असून यासाठी १५ हजार ६६ दिव्यांग लाभार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. जिल्ह्यातील दिव्यांगांची संख्या एक लाख १५ हजार ७५५ इतकी असून यातील ६८% ग्रामीण भागातील तर शहरी भागातील ३२ टक्के दिव्यांग संख्या आहे.

आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी २७ कार्यशाळा घेण्यात आले असून त्यातून ३७४२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.

या अभियानात आरोग्य यंत्रणा, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, समाज कल्याणचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था व मिशन इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग रिसर्च अँड क्शन(मित्रा) यंत्रणेवर जबाबदारी असून हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवून सहकार्य करण्याची अपेक्षा श्री. राऊत यांनी व्यक्त केली.

*शिबिर वेळापत्रक : जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्र्विक ओळखपत्र देण्याकरीता दिव्यांगत्व प्रमाणपत्र तपासणी आणि निदान विशेष मोहिम कार्यक्रम शिबीर वेळापत्रक तालुका, लाभार्थी संख्या, शिबीर स्थळ, दिनांक, वार व वेळ निहाय पुढीलप्रमाणे -

* पंढरपूर - १३४२, ग्रामीण रुग्णालय, पंढरपूर, दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४, सोमवार व मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * अक्कलकोट - १५३२, ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट, दिनांक २२ व २३ ऑगस्ट २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * बार्शी - १३५७, ग्रामीण रुग्णालय, बार्शी, दिनांक २६ व २७ ऑगस्ट २०२४, सोमवार व मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * माळशिरस - १७२०, ग्रामीण रुग्णालय, माळशिरस, दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * सांगोला - १८०३, ग्रामीण रुग्णालय, सांगोला, दिनांक २ व ३ सप्टेंबर २०२४, सोमवार व मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * करमाळा - १६२९, ग्रामीण रुग्णालय, करमाळा, दिनांक ५ व ६ सप्टेंबर २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता.* मोहोळ - १८४१, ग्रामीण रुग्णालय, मोहोळ, दिनांक ९, १० व १२ सप्टेंबर २०२४, सोमवार, मंगळवार व गुरुवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * माढा - १२९२, ग्रामीण रुग्णालय, कुर्डूवाडी, दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०२४, शुक्रवार व शनिवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * मंगळवेढा - ८०८, ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा, दिनांक १७ व १९ सप्टेंबर २०२४, मंगळवार व गुरुवार सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * सोलापूर दक्षिण - १२९४, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सोलापूर, दिनांक २० व २१ सप्टेंबर २०२४, शुक्रवार व शनिवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. *सोलापूर उत्तर - ५६१, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सोलापूर, दिनांक २३ सप्टेंबर २०२४, सोमवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता.

# येणेगुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवंता मानांकन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

येणेंगुर : तालुक्यातील येणेंगुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवंता मानांकन मिळाले आहे. या आरोग्य केंद्राला ८९.२१ गुण मिळाले असून अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्ना मुळे हे यश प्राप्त झाले असल्याची माहिती प्रा.आ. केंद्राच्या आरोग्य अधिकारी ऋतुजा साळुंखे यांनी माहिती दिली.



प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून सार्वजनिक रुग्णालयाची विश्र्वासार्हता वाढवण्यासाठी राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके उपक्रम राबवण्यात येत आहे. या नुसार १२ व १३ जुलैला येणेगुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके परीक्षण समितीकडून मूल्यांकन पडताळणी करण्यात आली. या वेळी तपासण्यात आलेल्या बाह्य रुग्ण विभाग, अंतर रुग्ण विभाग, प्रसुती विभाग, प्रयोगशाळा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, सामान्य प्रशासन व परिसर स्वच्छता या सहा सुविधांना प्रमाणित करून आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन देण्यात आले. या मुळे नागरिकांना मिळणाऱ्या सेवा सुविधां त्यांचा दर्जा दर्जाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. नागरिकांची प्राथमिक आरोग्य केंद्राकडे बघण्याची विश्र्वासार्हता नक्कीच वाढेल. मानांकनासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, डॉ.मारुती कोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नंदकुमार नेहरकर, आदींच्या मार्गदर्शनाखाली येणेगुर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा साळुंखे,डॉ. रूपाली आंग्रे, डॉ.वैष्णवी जाधव आदींनी परिश्रम घेतले. या करिता आरोग्य कर्मचारी,आशा कार्यकर्ती, ग्रामपंचायत प्रशासन आदींनी पुढाकार घेतला असल्याची माहिती डॉ ऋतुजा साळुंखे यांनी दिली.

# औसा विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचा भगवा सप्ताह

## सहसपर्कप्रमुख सोमवंशी यांच्या उपस्थितीत सदस्य नोंदणीचा शुभारंभ



लातूर/अमर जाधव : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार औसा विधानसभा मतदारसंघात भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत शिवसेना सह संपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या उपस्थितीत उजनी येथे गणेशनाथ मंदिरात दर्शन घेऊन शिवसेना पक्ष सदस्य नोंदणी शुभारंभ करण्यात आला.

शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून पक्ष वाढीसाठी प्रत्येक शिवसैनिकांनी सक्रिय सहभागी व्हावे व औसा विधानसभेवर भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन संतोष सोमवंशी यांनी यावेळी केले.

उजनी येथील आठवडी बाजारात सर्व व्यापाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केले.

यावेळी खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखरअण्णा चव्हाण, बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, बसवराज बरदापूरे, ड. दिपक वळके, एकंबीचे सरपंच काका पाटील, बंजारा ब्रिगेड तालुकाध्यक्ष राम चव्हाण, बाळकृष्ण कदम, उपतालुकाप्रमुख श्रीधर साळुंके, गणेश जाधव, विजय पवार, सरपंच सुरेश मुसळे, किशोर भोसले, श्रीहरी उत्के, माजी सरपंच बेलपान कास्ते, सोहेब शेख, अमित मुकडे, सुनिल जाधव, महेश जोशी, बाबा सगर, विकास वळके, सागर चव्हाण, उमाकांत सूर्यवंशी, काकासाहेब जवदराव, माऊली ढवण व ग्रामस्थ मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

# डाळिंब केंद्र गुणवत्ता कक्षावर ज्ञानेश्र्वर गुरव यांची निवड

**दैनिक यशसिद्धी न्यूज** उमरगा/प्रतिनिधीः जिल्हा परिषदेच्या आदेशानुसार केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष स्थापन करण्यात आले.तेव्हा शिक्षण परिषदेत डाळिंब केंद्राचे केंद्रप्रमुख कोकळगावे अब्दुल कादर यांच्या अध्यक्षतेखाली डाळिंब केंद्राचे गुणवत्ता कक्ष स्थापन करण्यात आले यात अध्यक्ष म्हणून केंद्राचे केंद्रप्रमुख कोकळगावे ए.एन,सदस्य म्हणून केंद्रांतर्गत मुख्याध्यापक श्री कबाडे एम एम,श्री ईश्र्वर नांगरे, जगताप एम.एस, शिक्षक श्री ननावरे पी एस, श्रीमती अनिता जाधव, श्रीमती गुरुशिद्दा गुळवे, श्री अंबुसे संदीप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष खमरोदीन इनामदार व सुपतगावचे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ज्ञानेश्र्वर गुरव, गुणवत्ता कक्षाचे सचिव श्री गोविंद जाधव,केंद्रीय शाळा डाळिंब यांची निवड करण्यात आली. शिक्षण परिषदेत भेट देऊन अनेक विषयावर मार्गदर्शन करून नूतन गुणवत्ता कक्षाचे स्वागत व अभिनंदन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांनी केले. यावेळी बीटचे विस्तार अधिकारी शशिकांत कदम, केंद्राचे साधन व्यक्ती श्रीमती शशिकला राठोड, डाळिंब नगरीचे उपसरपंच पिराजी पाटील, माजी उपसरपंच आसिफ शिलार,मार्गदर्शक धनराज फुरडे परिषदेत उपस्थित होते.

# एक सर्वसामान्य व्यक्ती मुख्यमंत्री बनते, ही भारतीय लोकशाहीची महानता : राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

ठाणे : भारतीय लोकशाहीला जगात सर्वश्रेष्ठ लोकशाही मानले जाते. एका सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती संघर्षातून मुख्यमंत्री बनते, ही भारतीय लोकशाहीची महानता आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.कोकण मराठी साहित्य परिषद, शारदा एज्युकेशन सोसायटी आणि ग्रंथाली प्रकाशन आयोजित प्रा. डॉ. प्रदीप ढवळ आणि डॉ. अरुंधती भालेराव, राजन बने व सान्वी ओक लिखित 'योद्धा कर्मयोगी- एकनाथ संभाजी शिंदे' चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा राम गणेश गडकरी रंगायतन, ठाणे येथील नाट्यगृहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. ग्रंथदिंडीच्या माध्यमातून हा चरित्र ग्रंथ मंचावर आणून याचे प्रकाशन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, ठाणे जिल्हा पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, पद्मश्री शंकर बाबा पापळकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार प्रताप सरनाईक, आमदार निरंजन डावखरे, आमदार रवींद्र फाटक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, साहित्य संमेलन अध्यक्ष रवींद्र शोभणे, शारदा एज्युकेशन सोसायटीचे विलास ठुसे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले की, मला छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीत काम करण्याची संधी मिळाली आहे, हे मी माझे भाग्यच समजतो. मला याचा मनस्वी आनंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आपली संस्कृती टिकली नसती. त्यांच्या महान कार्यामुळेच महाराष्ट्राचे नाव आज संपूर्ण देशात आदराने घेतले जाते. आधीच्या वक्त्यांनी केलेल्या भाषणातून आणि जमलेल्या जनसागराकडे पाहून माझी अशी खात्री झाली आहे की, एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री आहेत.राज्यपाल पुढे म्हणाले की, पुस्तके कधीही फुकट घेऊन वाचू नयेत. पुस्तकाचे मूल्य देऊन पुस्तके वाचल्यास आपल्या भावना त्या पुस्तकाचे वाचन करताना एकजीव होतात, त्यातील मतितार्थ आपल्याला समजतो, असे माझे व्यक्तिगत मत आहे.भारतीय लोकशाहीच्या महानतेमुळेच श्री. नरेंद्र मोदी प्रधानमंत्री तर श्री. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होऊ शकले.

जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रमाला पर्याय नाही, असे सांगून ते पुढे म्हणाले की, कोरोना काळात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केलेले काम हा महाराष्ट्र कधीही विसरू शकत नाही. त्यांनी गडचिरोलीसारख्या जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्या भागात केलेले काम हे अतिशय वाखाणण्याजोगे आहे. मनापासून एखादे काम करणे, ही इच्छाशक्ती असणे यातूनच व्यक्ती समाजासाठी काहीतरी करू शकतो, तसे काम मुख्यमंत्री श्री. शिंदे सतत करताना दिसून येतात. २०४७ साली भारत हा महासत्ता बनणार यात शंकाच नाही. विशेष म्हणजे हे शासन ज्या प्रकारे काम करीत आहे त्यातून महाराष्ट्राचा विकास हा होणारच.मी महाराष्ट्रात जनतेचा सेवक म्हणून आलो आहे. त्यामुळे शक्य तितकी जनसेवा करण्याचा संकल्प मी या कार्यक्रमाच्या निमित्ताने करीत आहे, असे ते शेवटी म्हणाले.

सर्वांच्या साथीने इथपर्यंत - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, माझ्यावर पुस्तक लिहिण्याइतपत मी असे काही मोठे काम केलेले नाही. सर्वांच्या साथीने मी इथपर्यंत पोहोचलो आहे, त्याबद्दल सर्वांचे आभार. सत्तेचा वापर हा गोरगरिबांच्या कल्याणासाठीच व्हायला हवा. मला काय मिळाले, यापेक्षा मी समाजाला काय दिले हे महत्त्वाचे आहे. म्हणूनच मी या मार्गावर काम करण्याचा प्रयत्न करतोय. मी कालही कार्यकर्ता होतो, आजही कार्यकर्ता आहे, आणि उद्याही मी कार्यकर्ताच राहणार आहे. मी असे मानतो की, सी. एम. म्हणजे कॉमन मॅन म्हणजे सर्वसामान्य माणूस. त्याआधारे काम करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करतोय. माझ्याकडे आलेला माणूस रिकाम्या हाताने कधीच जात नाही आणि कधी जाणारही नाही. संपूर्ण महाराष्ट्र हे मी माझे कुटुंब मानतो. यश आले तर हुरळून जाऊ नये आणि अपयश आले तर खचून जावू नये, ही आईची शिकवण मी आजही कायम स्मरणात ठेवली आहे. हे शासन चोवीस तास लोककल्याणासाठी काम करीत आहे. हे शासन विकास आणि कल्याण याची सांगड घालून लोकांसाठी चांगल्या योजना राबवीत आहे. यापुढेही हे शासन लोककल्याणाचा विचार करूनच निर्णय घेणार, राजकीय हिताचे कधीही निर्णय घेतले जाणार नाहीत.शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस येण्यासाठी आम्ही सर्व एकत्र मिळून प्रयत्नशील आहोत. त्यामुळे जे काम करीत आहोत ते सर्वसामान्य जनतेसाठीच. यामुळे माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी समाजासाठी काम करीत राहणार, माझ्या या सर्व वाटचालीत माझ्या पत्नीचा खूप मोठा वाटा आहे. तिची खंबीर साथ मला नेहमी समाजासाठी काम करण्याची सदैव प्रेरणा देते. माझ्या या सामाजिक कार्यात माझे सर्व कुटुंबिय सदैव माझ्या पाठीशी असतात, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी देव, देश आणि धर्मासाठी लढणे हा मंत्र जपला होता आणि आधुनिक युगात हा मंत्र जपताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या कृतीतून दिसतात. त्यांची संयमी वृत्ती, लोकांचे ऐकून घेण्याची प्रवृत्ती, कठोर मेहनतीची तयारी, विविध पदांना न्याय देण्याची वृत्ती हे त्यांचे गुणविशेष अनुकरणीय आहेत. जनतेत राहून जनतेसाठी काम करणे, हा ध्यास घेतलेला लोकनेता एकनाथ शिंदेंकडे पाहिले की दिसून येतो. संघर्षाला शांतपणे तोंड देण्याची वृत्ती, मित्रांप्रती कर्तव्य हेही त्यांचे गुणविशेष आहेत. अशा व्यक्तीचा चरित्र ग्रंथ प्रकाशित होणे, हे निश्र्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक असते. अशा व्यक्तींचे चरित्र वाचल्यावर ते सर्वसामान्यांना नेहमीच प्रेरणा देतात आणि त्यातून सर्वसामान्य नागरिक घडतातही.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी सुसंस्कृत राजकारणाची शिकवण अवघ्या महाराष्ट्राला दिली. त्यांच्या शिकवणीचे अनुकरण करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. लोकांच्या सदैव गराड्यात राहणारा मुख्यमंत्री, शेतीची आवड असणारा मुख्यमंत्री, गावाकडे रमणारा मुख्यमंत्री ही सर्व विशेषणे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना लागू होतात. त्यांच्या सर्व यशात त्यांच्या सर्व कुटुंबियांचेही मोठे योगदान आहे.

याप्रसंगी पद्मश्री शंकर बाबा पापळकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या मनोगतात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाविषयी अनेक उदाहरणे देऊन ते सर्वसामान्यांचे नेते आहेत, ते लोकनेते आहेत, ते अनाथांचे नाथ आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले.कार्यक्रमाची प्रस्तावना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केली तर सूत्रसंचालन नरेंद्र बेडेकर यांनी केले. या चरित्र ग्रंथाचे लेखक प्रा.डॉ.प्रदीप ढवळ यांनी मनोगत व्यक्त करताना या चरित्र ग्रंथाच्या निर्मिती विषयीची माहिती उपस्थितांना दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, पुस्तकाचे लेखक प्रा.डॉ.प्रदीप ढवळ, डॉ.अरुंधती भालेराव, राजन बने आणि सान्वी ओक तसेच ग्रंथाली प्रकाशनचे सुरेश हिंगलासपूरकर यांचा राज्यपाल व मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मातोश्री स्वर्गीय गंगूबाई संभाजी शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून तसेच राष्ट्रगीत व राज्यगीताने करण्यात आली. शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री.विलास ठुसे यांनी आभार मानले.